जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे








दैनिक | वर्ष १ | अंक २४८ | मंगळवार, ७ एप्रिल २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210


# लोणी काळभोर येथे पोलिसांनी जप्त केलेल्या वाहनांना भीषण आग

## चार वाहने जळून खाक; दोन तासांच्या प्रयत्नांनंतर नियंत्रण

**लोणी काळभोर, ता. ६ :** लोणी काळभोर पोलिसांनी विविध गुन्ह्यात जप्त करण्यात आलेले वाहने बाजारतळावर पार्क केलेली आहेत. यातील चार वाहनांना सोमवारी (ता. ६) दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागली. या आगीत चारही वाहने जळून खाक झाली आहे. तर या आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी अग्निशामक दल, ग्राम पंचायत प्रशासन व पोलिसांनी तब्बल २ तासांचा कालावधी लागला. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, बाजारतळ परिसरात उभी असलेली काही वाहने अचानक पेट घेत असल्याचे लोणी काळभोरचे सामाजिक कार्यकर्ते विशाल वेदपाठक यांना दिसले. त्यांनी ताबडतोब या घटनेची माहिती लोणी काळभोर पोलिसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच, लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, पोलीस उपनिरीक्षक



दिगंबर सोनटक्के, सहाय्यक फौजदार नवले, पोलीस हवालदार वैजिनाथ शेलार, महेश चव्हाण, रवी आहेर, बापूसाहेब वाघमोडे, पोलीस अंमलदार सोमनाथ गळाकाटे, प्रशांत नरसाळे व त्यांचे १५ हून अधिक सहकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

सुरुवातीला लहानशी ठिणगी वाटणारी ही आग काही क्षणांतच भडकली आणि शेजारी उभ्या असलेल्या इतर वाहनांनाही तिचा विळखा बसला. आगीचे लोळ उसळताना पाहून पोलिसांनी तत्काळ हडपसर अग्निशामक दलाला आगीची माहिती दिली. अग्निशामक दलाची गाडी येण्यापर्यंत पोलिसांनी आगीवर पाण्याचा मारा केला. तसेच लोणी काळभोरचे प्रशासन नागेश काळभोर आग लागल्याच्या ठिकाणी दाखल आले. त्यांनी ग्रामपंचायतीच्या वतीने पाण्याचा टँकर बोलावून आग विझविण्याचा प्रयत्न केला. परंतु, तोपर्यंत आगीने रौद्र रूप धारणे केले होते.

तेवढ्यात हडपसर अग्निशमन केंद्राचे तांडेल शौकत शेख, चालक नारायण जगताप, फायरमन बाबासाहेब चव्हाण, अनिकेत तारू, ज्ञानेश्वर ढाकणे हे तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी अतिशय तत्परतेने आणि समन्वयाने पाण्याचा मारा करत आगीवर नियंत्रण मिळवण्याचे काम हाती घेतले. काही काळाच्या प्रयत्नानंतर अखेर ही भीषण आग आटोक्यात आणण्यात यश आले.

दरम्यान, या आगीत चार वाहने पूर्णपणे जळून खाक झाली असून, गाड्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले, तरी कचऱ्यामुळे आग लागल्याची शक्यता वर्तवली जात आहे. याबाबत पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे. बाजारतळ हा नेहमीच गर्दीचा परिसर असल्याने ही आग आणखी वाढली असती, तर मोठी दुर्घटना घडू शकली असती. मात्र अग्निशामक दल, ग्रामपंचायत कर्मचारी आणि पोलिसांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे संभाव्य मोठा अनर्थ टळल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

### हाकेच्या अंतरावर गाड्या तरी मदत नाही!

हाकेच्या अंतरावर अग्निशमन गाड्या असतानादेखील त्या वेळेवर उपलब्ध होत नसतील, तर ते दुर्दैवच म्हणावे लागेल. लोणी काळभोर येथे दोन मोठ्या तेल कंपन्यांकडे स्वतःच्या अग्निशमन गाड्या असतानाही, परिसरात आग लागल्यावर गाडी खराब आहे, चालत नाही अशी कारणे देत मदतीपासून हात झटकला जातो, असा गंभीर आरोप स्थानिकांकडून होत आहे. आग लागून मानवी जीवितास धोका निर्माण झालेला असतानाही मदत न मिळणे, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. सुरक्षा यंत्रणांवरच प्रश्नचिन्ह उभे राहत असून, जबाबदारी नेमकी कोणाची? असा सवाल उपस्थित होत आहे.

**लोणी काळभोर, उरुळी कांचनला अग्निशमन केंद्राची मंजुरी कागदावरच**

लोणी काळभोर, उरुळी कांचन परिसरात झपाट्याने वाढत असलेल्या शहरीकरण, नागरीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे आगीच्या घटना वारंवार घडत आहेत. मात्र, या भागासाठी मंजूर झालेले अग्निशमन केंद्र आजही प्रत्यक्षात उतरलेले नाही. हडपसर आणि वाघोली येथून अग्निशमन गाड्या पोहोचेपर्यंत मोठे नुकसान होत असायचे, यामुळे पूर्व हवेलीत आग लागून होणारे नुकसान टाळण्यासाठी पुणे प्राईम न्यूजने वारंवार आवाज उठविला होता. याची दखल घेऊन व जनमताचा रेटा पाहून प्रशासनाने लोणी काळभोर, उरुळी कांचन केडगावसह जिल्ह्यात या १० ठिकाणी अग्निशामक अग्निशमन केंद्रांना मंजुरी दिली. मात्र, मंजुरी मिळून तब्बल एक वर्ष उलटूनही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. ही मंजुरी केवळ कागदावरच राहणार का? असा थेट सवाल आता उपस्थित केला जात आहे.

## संक्षिप्त




### डिलिव्हरी बॉयचे काम मागितल्याच्या वादातून तरुणाला मारहाण

**पिंपरी, ता. ६ :** डिलिव्हरी बॉय म्हणून काम करण्यावरून झालेल्या वादातून दोन तरुणांनी एका डिलिव्हरी पार्टनरला मारहाण करून त्याचे नाक फॅक्चर केले आणि दात पाडले. ही घटना शनिवारी (ता. ०४) पिंपरीत घडली. या प्रकरणात १९ वर्षीय तरुणाने संत तुकाराम नगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आणि त्यांचा मित्र चहा पिण्यासाठी गेले असताना आरोपीने डिलिव्हरी बॉयचे काम मागितले. फिर्यादीच्या मित्राने त्याला काम करू नकोस असे म्हटल्याचा राग मनात धरून आरोपींनी वाद सुरू केला. आरोपीने फिर्यादीच्या नाकावर जोरात ठोसा मारून नाक फॅक्चर केले, तर दुसऱ्या आरोपीने डोळ्यावर आणि ओठावर मारून फिर्यादीचे दात पाडले. संत तुकाराम नगर पोलीस तपास करत आहेत.

### तुळशीबागेत चोरट्यांचा सुळसुळाट; महिलांकडील दागिने चोरी

**पुणे, ता. ६ :** महिला वर्गाचे खरेदीचे हक्काचे ठिकाण असलेल्या तुळशीबागेत महिलांकडील दागिने, रोकड चोरीला जाण्याच्या घटना वाढल्या आहेत. वेगवेगळ्या घटनांमध्ये चोरट्यांनी खरेदीसाठी आलेल्या महिलांकडील ७२ हजार रुपयांचा ऐवज लांबविला. तुळशीबागेत खरेदीसाठी आलेल्या महिलेच्या पिशवीतून ५२ हजार रुपयांचे मंगळसूत्र चोरट्याने लांबविल्याची घटना नुकतीच घडली. या प्रकरणी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत एका महिलेने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिला तुळशीबागेत शनिवारी (ता. ०६) दुपारी चारच्या सुमारास खरेदीसाठी आली होती. तुळशीबाग गणपती मंदिर परिसरात चोरट्याने पिशवीत ठेवलेले मंगळसूत्र चोरून नेले.दुसऱ्या एका घटनेत रविवारी (ता. ०५) दुपारी तुळशीबागेत खरेदी करणाऱ्या महिलेच्या पिशवीतून २० हजारांचे मंगळसूत्र चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली. याबाबत एका महिलेने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार ५५ वर्षीय महिला वारजे-एनडीए रस्त्यावरील उत्तमनगर भागात राहायला आहे. रविवारी दुपारी दीडच्या सुमारास त्या तुळशीबागेत खरेदी करत होत्या. त्या वेळी गर्दीत महिलेचे लक्ष नसल्याची संधी साधून चोरट्यांनी पिशवीतून मंगळसूत्र चोरून नेले. पोलीस कर्मचारी गोरे तपास करत आहेत.

# तुमची साथ हीच माझी शक्ती ; सुनेत्रा पवारांची बारामतीकरांना भावनिक साद

**बारामती, ता. ६ :** बारामती विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांनी अत्यंत भावनिक शब्दांत जनतेशी संवाद साधला. उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी आयोजित मेळाव्यात बोलताना त्यांनी दिवंगत अजित पवार यांच्या आठवणी जागवत, त्यांचे जाणे ही केवळ वैयक्तिक हानी नसून संपूर्ण बारामती आणि महाराष्ट्रासाठी मोठा धक्का आहे, असे सांगितले.

बारामती हा गेल्या ३५-३६ वर्षांपासून राष्ट्रवादीचा बालेकिल्ला मानला जातो. अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली येथे सातत्याने विकासकामे झाली, त्यामुळे स्थानिक जनतेशी त्यांचे घट्ट नाते निर्माण झाले. त्यांच्या निधनानंतर निर्माण झालेली भावनिक पोकळी आणि नेतृत्वाचा प्रश्न लक्षात



घेता ही पोटनिवडणूक अत्यंत महत्त्वाची ठरते. सुनेत्रा पवार यांनी आपल्या भाषणात सांगितले की, दादांसाठी बारामती ही केवळ मतदारसंघ नव्हती, तर ती त्यांच्या आयुष्याचा श्वास होती. इथल्या प्रत्येक नागरिकाशी त्यांचे जिव्हाळ्याचे नाते होते. त्यांनी पुढे स्पष्ट केले की, गेल्या अनेक वर्षांत बारामतीकरांनी दिलेल्या प्रचंड पाठिंब्यामुळेच आज त्या धैर्याने जनतेसमोर उभ्या आहेत.

या मेळाव्याला एकनाथ शिंदे, राधाकृष्ण विखे पाटील, सुनील तटकरे, छगन भुजबळ यांसह अनेक वरिष्ठ नेते उपस्थित होते, ज्यामुळे या निवडणुकीचे राजकीय महत्त्व अधोरेखित झाले. सुनेत्रा पवार यांनी विकासाचा मुद्दा पुढे करत सांगितले की, ४ वेळा मुख्यमंत्री राहिलेल्या साहेबांची सून आणि ६ वेळा उपमुख्यमंत्री राहिलेल्या अजित पवार यांची पत्नी म्हणून मला राज्यकारभार समजून घेण्याची आणि जबाबदारी पेलण्याची ताकद मिळाली आहे.

अजित पवार यांच्या कार्याचा उल्लेख करत त्यांनी स्पष्ट केले की, दादांची जागा कुणीच घेऊ शकत नाही. मात्र त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी मी स्वीकारते. त्यांनी बारामतीकरांशी असलेले आपले नाते अधिक घट्ट करत सांगितले की, जय पवार आणि पार्थ पवार हेच फक्त माझं कुटुंब नाही, तर बारामतीतील प्रत्येक नागरिक हेच माझं खरे कुटुंब आहे.

सुनेत्रा पवार यांनी जनतेला विश्वास देत म्हटले की, एकालाही वाऱ्यावर सोडणार नाही. प्रत्येकाच्या पाठीशी ठामपणे उभी राहीन. त्यांनी अजित पवार यांच्या जनता दरबार परंपरेचा उल्लेख करत तो पुढे सुरू ठेवण्याचे आश्वासन दिले.बारामतीचा विकास थांबणार नाही, प्रशासनावर मजबूत पकड राहील आणि गुंडगिरीला कोणतीही जागा दिली जाणार नाही, असे आश्वासन दिले. त्यांनी अजित पवार यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त करत, जनतेचा विश्वास आणि साथ हीच माझी खरी ताकद आहे, असेही सांगितले.

दरम्यान, ही पोटनिवडणूक केवळ प्रतिनिधी निवडण्यापुरती मर्यादित नसून, बारामतीच्या भविष्यातील राजकीय दिशा आणि विकासाच्या गतीचा निर्णय करणारी ठरणार आहे.

### दुचाकीवरून गांजाची वाहतूक करणाऱ्याला पकडले

**भोसरी, ता. ६ :** विक्रीसाठी बेकायदेशीरपणे गांजा घेऊन जाणाऱ्या एका व्यक्तीला अमली पदार्थ विरोधी पथकाने सापळा रचून पकडले. ही कारवाई एम.आय.डी.सी. भोसरी येथे करण्यात आली. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल चंद्रकांत जाधव यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी एकाला ताब्यात घेतले असून त्याच्या पत्नीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीच्या ताब्यातून ५ हजार ६०० रुपये किमतीचा ११२ ग्रॅम गांजा, एक दुचाकी आणि मोबाईल असा एकूण १ लाख ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. चौकशीत आरोपीने सांगितले की, त्याची अपंग पत्नीने हा गांजा विक्रीसाठी आणून दिला होता. एमआयडीसी भोसरी पोलीस तपास करत आहेत.

# ही निवडणूक बिनविरोध व्हावी अशी आमची इच्छा : एकनाथ शिंदे

**पुणे, ता. ६ :** बारामतीची पोटनिवडणूक आम्ही महायुती लढवत आहोत. या भागातील जनता सुनेत्रा ताई यांच्या पाठीशी आहे, ही निवडणूक बिनविरोध व्हावी अशी आमची इच्छा आहे. कोणी असं गेलं तर आपली एक प्रथा आहे की, ती निवडणूक बिनविरोध व्हावी. अशी प्रतिक्रिया दे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ही प्रथा पुढे नेण्याची विनंती इतर पक्षांना केली आहे. बारामतीत आज उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. त्यासाठी सुरु असलेल्या राष्ट्रवादीच्या मेळाव्यात ते बोलत होते.



शिंदे म्हणाले, सुनेत्रा ताई यांचा उमेदवारी अर्ज आपण भरत आहोत. आमचे दिवंगत सहकारी दादा यांना श्रद्धांजली अर्पण करतो. माझी लाडकी बहीण योजनेची व्याप्ती मोठी होती. खर्च मोठा होता पण दादा यांनी घडी विस्कटू न देता योजना राबवण्यासाठी अजितदादा कंबर कसली. अतिशय वेळेवर चोखपणे, सडेतोडपणा त्यांच्यात होता. तेवढाच प्रेमळ स्वभाव आपण पाहिला.

सुनेत्रा ताई यांनी देखील उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारली. सांत्वन करणे सोपं असतं दुःख पचवणे कठीण असतं. आपण परिवारातील असल्यामुळे एकत्र आलो आहोत. सकाळी लवकर उठून दादा काम करायचे, मी रात्री उशिरापर्यंत काम करतो. दादा राजकारणी नसते तर इंजिनियर झाले असते कारण बारीक काम ते बघत होते. दादा हे नाव तोंडी आज ही आहे त्यांच्या कामाची पोचपावती तुम्हाला मिळाल्याशिवाय राहणार नाही. ही निवडणूक बिनविरोध व्हावी अशी आमची इच्छा असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले आहे.

# काँग्रेसने बारामतीत उमेदवार देणं चुकीचे नाही : शरद पवार

**बारामती, ता. ६ :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सोमवारी राज्यसभा खासदारकीची शपथ घेतल्यानंतर प्रसारमाध्यमांशई संवाद साधला. यावेळी बारामती मतदारसंघातील पोटनिवडणूक राजकारण आणि दोन्ही पक्षातील विलीनीकरणावर आपली भूमिका स्पष्ट केली.



काँग्रेसने बारामती विधानसभा पोटनिवडणुकीमध्ये आपला उमेदवार उतरवला आहे. आकाश मोरे हे काँग्रेसच्या चिन्हावर निवडणूक लढवत असून, त्यावर शरद पवारांनी पहिल्यांदाच भाष्य केले. काँग्रेसने बारामती विधानसभा मतदारसंघात उमेदवार देणे चुकीचे नाही. निवडणूक बिनविरोध करण्याचे काही कारण नाही. समोर कुणीतरी असेल हे मान्य करून निवडणुकीत उतरायला हवे. कुटुंबप्रमुख म्हणून या निवडणुकीची माझ्यावर जबाबदारी आहे, अशी भूमिका शरद पवार यांनी मांडली आहे.

बारामती पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी महत्त्वाचं विधान केलं आहे. निवडणूक लढवताना समोर कुणीतरी प्रतिस्पर्धी असेल हे गृहित धरूनच मैदानात उतरावं, असा सल्ला त्यांनी दिला. राजकीय घडामोडींमध्ये बिनविरोध निवडणुकीची चर्चा सुरू असताना पवारांच्या या वक्तव्याला विशेष महत्त्व प्राप्त झालं आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे बारामतीतील राजकीय समीकरणांबाबत चर्चा होत आहे.

दरम्यान, आमच्या पक्षात कोणत्याही प्रकारच्या विलिनीकरणाची चर्चा सुरू नाही, असं सांगत शरद पवारांनी सुरु असलेल्या राजकीय चर्चांना पूर्णविराम दिला आहे. अलीकडच्या घडामोडींमध्ये विविध तर्क-वितर्कांना उधाण आलं असताना पवारांच्या या वक्तव्यामुळे चित्र स्पष्ट झालं आहे. पक्षाच्या भविष्यासंदर्भात आणि आघाड्यांच्या शक्यतांबाबत सुरू असलेल्या चर्चांमध्ये पवारांनी ठाम भूमिका मांडत कोणत्याही विलिनीकरणाच्या शक्यतेला नकार दिला आहे. त्यामुळे आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय समीकरणांबाबत चर्चा होत आहेत.

# डोर्लेवाडीतील ‘गुरे’ राखणारा मारुती साळुंके झाला पिंपरी-चिंचवड पोलीस दलात भरती

## मूकबधिर आई-वडिलांच्या कष्टाचे झाले चीज

**गोरख जाधव**

डोर्लेवाडी, ता. ६ : परिस्थिती कितीही कठीण असली, तरी जिद्द आणि मेहनत असेल तर यश निश्चित मिळते, हे डोर्लेवाडी (ता. बारामती) येथील मारुती ज्ञानदेव साळुंकेया तरुणाने आपल्या कृतीतून सिद्ध करून दाखवले आहे. घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची, आई-वडील आणि बहीण मूकबधिर, अशा परिस्थितीत म्हशी राखण्याचे काम करत मारुतीने पिंपरी-चिंचवड पोलीस दलात भरती होऊन यशाला गवसणी घातली आहे.

मारुतीचा हा प्रवास सोपा नव्हता. त्याचे आई-वडील मूकबधिर असून ते दिवसभर म्हशी सांभाळण्याचे काम करतात. कुटुंबाचा उदरनिर्वाह पूर्णपणे दुधविक्रीवर अवलंबून आहे. मारुती स्वतः पोलीस भरतीची तयारी करत असताना आपल्या आई-वडिलांना मदत म्हणून म्हशींना चारा-पाणी करणे आणि सकाळ-संध्याकाळ घरोघरी दुधाचे रतीब पोहोचवण्याचे काम नित्यनियमाने करत असे. घरची कामे आणि कुटुंबाला हातभार लावत असतानाही त्याने आपले लक्ष अभ्यासावरून ढळू दिले नाही.

मारुतीच्या घरात शिक्षणाचा कोणताही वारसा नाही. घरात कोणीही शिक्षित नसताना आणि



वयोवृद्ध आजी-आजोबांच्या देखभालीची जबाबदारी खांद्यावर असतानाही मारुतीने हार मानली नाही. त्याची एक बहीण छाया साळुंके यांची एक बहिण मूकबधिर असून तिचा विवाह झाला आहे, तर दुसरी बहीण आशा ज्ञानदेव साळुंके ही डोर्लेवाडीत दहावीत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होऊन सध्या एमपीएससीची (mpsc) तयारी करत आहे. बहिणीचा आदर्श आणि कुटुंबाची ओढ यातून मारुतीने अहोरात्र मेहनत घेतली.

कोणतेही मोठे मार्गदर्शन किंवा आर्थिक पाठबळ नसताना केवळ स्वतःच्या कष्टावर मारुतीने हे यश संपादन केले आहे. त्याच्या निवडीची बातमी समजताच संपूर्ण परिसरात आनंदाची लाट उसळली असून गावकऱ्यांकडून त्याचा अभिमानाने सत्कार केला जात आहे. आई-वडिलांचे कष्ट आणि त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद हेच माझ्या यशाचे गमक आहे, अशा भावना मारुतीने व्यक्त केल्या आहेत. दरम्यान, प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करत मारुतीने मिळवलेले हे यश आजच्या ग्रामीण भागातील हजारो तरुणांसाठी आशेचा किरण ठरले आहे. त्याच्या या दैदीप्यमान यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून गावकऱ्यांमध्ये अभिमानाची भावना निर्माण झाली आहे.

## संक्षिप्त

### नाशिकमधील म्हाडाची घरे हडपण्याच्या घोटाळ्याची वेळ पडल्यास ईडी चौकशी



**नाशिक, ता. ६ :** नाशिकमधील म्हाडा गृहप्रकल्पामध्ये गरीबांच्या हक्काची घरे हडपण्याचे प्रकरण अत्यंत गंभीर आहे. यामध्ये कितीही मोठी आसामी असली तरी सोडणार नाही. प्रसंगी या प्रकरणाचा तपास ईडीकडे सोपवू, असा इशारा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला. नाशिक दौरयात चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी संवाद साधला. गरिबांसाठी असलेली वीस टक्के घरे बळकावली गेली आहेत. एकाच दिवसात जमिनीचे तुकडे पाडणे, नोंदी घेणे आणि नकाशे मंजूर करणे हे मोठे वर्तुळ आहे. या प्रकरणासाठी एसआयटी स्थापन करण्यात आली असून यात एक आयपीएस आणि दोन आयएएस अधिकारी आहेत. चौकशी अहवाल पंधरा दिवसांत येईल. लाचलुचपत विभाग आणि भूमी अभिलेख विभागातून या घोटाळ्याची सुरुवात झाली असून, नाशिक विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना याप्रकरणी कडक कारवाईचे आदेश दिले आहेत. केवळ शिक्षा नाही, तर बिल्डरांकडून वीस टक्के मालमत्ता ताब्यात घेऊन ती गरीबांना मिळवून देणार असल्याचे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

### मकोका कारवाईनंतर फरार झालेला गुंड बीडमधून अटकेत

**बीड, ता. ६ :** महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई केल्यानंतर फरार झालेल्या गुंडाला गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथकाने बीड जिल्ह्यातून अटक केली. कारवाईनंतर सराईत गेले वर्षभर पोलिसांना गुंगारा देत होता. प्रथम नितीन मोहिते (वय २१, सध्या रा. शिवाजीनगर गावठाण, मूळ रा. खडकपुरा पेठ, जि. बीड) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. मोहिते याच्याविरुद्ध शिवाजीनगर पोलिसांनी मकोका कारवाई केली होती. कारवाई केल्यानंतर तो पसार झाला होता. मोहिते याने मारहाण, धमकी देणे अशा प्रकारचे गुन्हे फरार झाल्यानंतर केले होते. मोहिते हा बीड जिल्ह्यात असल्याची माहिती तपास पथकाला मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने सापळा लावून त्याला बीड परिसरातून अटक केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक राजेश माळगावे, पोलीस कर्मचारी रणजीत फडतरे, अमोल आवाड, मयूर भोकरे आणि पथकाने ही कारवाई केली.

### भागीदारी व्यवसायात ३६ लाखांचा अपहार; बांधकाम व्यावसायिकावर गुन्हा

**भोसरी, ता. ६ :** बांधकाम व्यवसायात भागीदारी करून गुंतवणूकदाराच्या पैशांचा वैयक्तिक कामासाठी वापर करून फसवणूक केल्याचा प्रकार भोसरी येथे उघडकीस आला आहे. ही घटना १२ फेब्रुवारी २०२४ ते ७ऑक्टोबर २०२५ दरम्यान इंद्रायणीनगर, भोसरी येथे घडली. याप्रकरणी ३३ वर्षीय व्यक्तीने एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार एका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने फिर्यादीला भागीदारीत बांधकाम व्यवसाय करण्यास प्रवृत्त केले होते. फिर्यादीने संस्थेमध्ये एकूण ८० लाख ४७ हजार ३४९ रुपयांची गुंतवणूक केली होती. आरोपीने त्यापैकी ३६ लाख ९५ हजार ८८० रुपये व्यवसायासाठी न वापरता स्वतःच्या वैयक्तिक कामासाठी खर्च केले. फसवणूक लपवण्यासाठी आरोपीने बनावट हिशोब तयार करून फिर्यादीला ईमेलवर पाठवला होता. आरोपीने स्वतःची सॅलरी व कमिशन दाखविले. तसेच स्वतःच्या वैयक्तिक कामासाठी पैसे खर्च करून फिर्यादी यांच्या पैशांचा अपहार करत त्यांची फसवणूक केली. एमआयडीसी भोसरी पोलीस तपास करत आहेत.

### गुंतवणुकीवर परताव्याचे आमिष दाखवून १३ लाखांचा गंडा




**देहूरोड, ता. ६ :** जादा परतावा देण्याचे आमिष दाखवून एका व्यक्तीची लाखांची फसवणूक केली. ही घटना जुलै २०२५ ते ३ मार्च २०२६ दरम्यान किवळे येथे घडली. या प्रकरणात ३८ वर्षीय महिलेने देहूरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार एका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने फिर्यादी आणि त्यांच्या एका मित्राला गुंतवणुकीवर ५ ते ७ टक्के परतावा देण्याचे आश्वासन दिले होते. त्यावर विश्वास ठेवून फिर्यादी यांनी क्रेडिट कार्डद्वारे १५ लाख २५ हजार रुपयांची गुंतवणूक केली. आरोपीने सुरुवातीला २ लाख ५ हजार रुपये परतावा म्हणून दिले, मात्र उर्वरित रक्कम परत न करता फिर्यादीची आर्थिक फसवणूक केली. देहूरोड पोलीस तपास करत आहेत.

# लोणी काळभोर पोलीस ठाण्यात मनुष्यबळाचा तुटवडा

## जेमतेम कर्मचाऱ्यांवर कामाचा अनेक पटींनी ताण

**लोणी काळभोर, ता. ६ :** शहरात गुन्हेगारी वाढली की सर्वसामान्य नागरिकांकडून पोलिसांवर टीका करण्याची प्रवृत्ती वाढताना दिसते. मात्र, पोलिस कोणत्या बिकट परिस्थितीत काम करत आहेत, याकडे मात्र दुर्लक्ष केले जाते. स्मार्ट सिटीच्या गप्पा मारणाऱ्यांनी आधी पोलीस ठाण्यांना पुरेसे मनुष्यबळ द्यावे, अशी परिस्थिती सध्या निर्माण झाली आहे.

लोणी काळभोर पोलीस ठाण्यातून तब्बल ३५ हून अधिक अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत, तर दोन पोलीस उपनिरीक्षक सेवेतून निवृत्त झाले आहेत. आधीच मर्यादित मनुष्यबळ असताना एवढ्या मोठ्या प्रमाणात झालेल्या बदल्यांमुळे पोलीस यंत्रणा ढासळण्याच्या स्थितीत पोहोचली आहे. उपलब्ध कर्मचाऱ्यांवर




अनेक पटींनी कामाचा ताण वाढला असून, जेमतेम मोजक्या कर्मचाऱ्यांवर संपूर्ण जबाबदारी पडली आहे.

नव्याने केवळ एक-दोन कर्मचाऱ्यांची नेमणूक करून जागा भरल्याचा आभास निर्माण केला जात असला, तरी प्रत्यक्षात पोलीस ठाणे मनुष्यबळाच्या तीव्र टंचाईशी झुंज देत आहे. सगळं सुरळीत आहे असा दिखावा केला जात असला, तरी वास्तव मात्र पूर्णपणे वेगळे आहे. या परिस्थितीचा थेट परिणाम कायदा आणि सुव्यवस्थेवर होताना दिसत आहे. लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरी, वाहनचोरी, पाकीटमारी, हाणामाऱ्या, खून, खुनाचे प्रयत्न, दरोडे, महिलांवरील अत्याचार आणि विद्यार्थिनींच्या छेडछाडीचे प्रकार सातत्याने वाढत आहेत. याशिवाय ऑनलाइन व ऑफलाइन फसवणूक करणाऱ्या टोळ्यांनीही डोकेवर काढले असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पार्किंगची योग्य व्यवस्था नसल्यामुळे वाहनचोरीचे प्रकार अक्षरशः रोजचे झाले आहेत. या वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस ठाण्याच्या हद्दीत तीन पोलीस चौक्या उभारण्यात आल्या आहेत. मात्र, अपुऱ्या मनुष्यबळामुळे या चौक्याही नावालाच उरल्या असल्याचे चित्र आहे. प्रत्येक चौकीत पुरेसे पोलीस नसल्याने गुन्हेगारीवर वचक ठेवणे कठीण झाले आहे. परिणामी, गुन्हेगारांमध्ये पोलिसांचा धाक कमी होत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. सदरक्षणाय खलनिग्रहणाय या ब्रीदवाक्यानुसार पोलीस आपले कर्तव्य प्रामाणिकपणे बजावत असले, तरी उपलब्ध साधनसामग्री आणि मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे त्यांच्यावर प्रचंड ताण निर्माण झाला आहे. दिवस-रात्र काम करूनही अपेक्षित परिणाम साधता येत नसल्याने पोलिसांची दमछाक होत आहे. दरम्यान, सध्या सर्वसामान्य नागरिकांपुढे मोठा प्रश्न उभा ठाकला आहे.

लोणी काळभोर पोलीस ठाण्याला आवश्यक मनुष्यबळ कधी मिळणार? वाढत्या गुन्हेगारीला आळा कधी बसणार? प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष दिले नाही, तर परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. स्मार्ट सिटीच्या गप्पांपेक्षा प्रत्यक्षात मजबूत पोलीस यंत्रणा उभी करण्याची गरज आता अधिक तीव्रतेने जाणवू लागली आहे.

### भंगार विक्रेत्याला लोखंडी रॉडने मारहाण

**चिंचवड, ता. ६ :** आईकडे का पाहतोस असे विचारून एका तरुणाने भंगार गोळा करणाऱ्या व्यक्तीला लोखंडी रॉडने बेदम मारहाण करून गंभीर जखमी केले. ही घटना ३ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास बिजलीनगर, चिंचवड येथे घडली. याबाबत ४० वर्षीय व्यक्तीने चिंचवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी भरत किशोर दोलारामन (बिजलीनगर, चिंचवड) याला अटक केली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे घरासमोरून भंगारच्या बाटल्या गोळा करत जात असताना आरोपीच्या आईने त्यांना माझ्याकडे काय पाहतो असे विचारले. फिर्यादीने मी पाहत नाही असे उत्तर दिले असता आरोपीने रागाच्या भरात येऊन शिवीगाळ व धक्काबुक्की केली. त्यानंतर आरोपीने लोखंडी रॉडने फिर्यादीच्या पायावर, हातावर आणि डोक्यावर वार करून त्यांना गंभीर जखमी केले. चिंचवड पोलीस तपास करत आहेत.

# फुरसुंगीत विवाहितेचा सासरकडून छळ; मारहाण करून जबरदस्तीने गर्भपात, १२ जणांवर गुन्हा

**फुरसुंगी, ता. ६ :** फुरसुंगी परिसरात एका विवाहित महिलेला पती व सासरच्या मंडळींकडून झालेल्या अमानुष छळाचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. लग्नानंतर सातत्याने मानसिक व शारीरिक त्रास देत अखेर पतीने जबरदस्तीने गर्भपात केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी फुरसुंगी पोलीस ठाण्यात १२ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

चंद्रशेखर शरणाप्पा गोलसर, चंद्रभागा परमेश्वर बनसोडे, परमेश्वर बनसोडे, त्रिमुर्ती शरणाप्पा गोलसर, महेश शरणाप्पा गोलसर, प्रेमा प्रकाश वाघमारे, प्रकाश वाघमारे, सुशोधन बलभीम गावडे, बलभीम गावडे, श्रीदेवी (पुर्ण नाव माहित नाही), रतनबाई (पुर्ण नाव माहित नाही) व अंबिका त्रिमुर्ती गोलसर अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी एका ३६ वर्षीय विवाहितेने फुरसुंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला ही नोकरी करणारी असून २०१७ मध्ये ओळखी झालेला मित्र चंद्रशेखर गोलसर याच्यासोबत प्रेमविवाह केला होता. सुरुवातीला संसार सुरळीत सुरू असला तरी काही दिवसांतच सासरच्या मंडळींकडून त्रासाला सुरुवात झाली. पती, नणंद व इतर नातेवाईकांकडून शिवीगाळ, मारहाण, अपमानास्पद वक्तव्ये करण्यात येत होती. तु आमच्या लायकीची नाहीस, तुला सुखाने संसार



करू देणार नाही अशा शब्दांत मानसिक छळ केला आहे. यानंतर पतीने तिच्या चारित्र्यावर संशय घेत सतत भांडणे सुरू केली. त्याचबरोबर दुसऱ्या महिलेसोबत संबंध असल्याचा संशय व्यक्त करत पीडितेने विरोध केल्यावर तिला मारहाण करण्यात आली. इतकेच नव्हे तर पतीने तिला मंगळसूत्र घालू न देणे, लग्न लपवण्यास भाग पाडणे असे प्रकारही केल्याचे समोर आले आहे.

दरम्यान, पीडिता गर्भवती असताना पतीने जबरदस्तीने तिला रुग्णालयात नेऊन गर्भपात केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या घटनेनंतरही पतीकडून धमक्या, मारहाण आणि शारीरिक संबंधांची जबरदस्ती सुरूच होती, असे तिने तक्रारीत नमूद केले आहे. पीडितेच्या तक्रारीनुसार पतीसह नणंद, दिर, जाऊ व इतर नातेवाईकांविरोधात शारीरिक व मानसिक छळ, मारहाण, धमक्या आणि जबरदस्ती गर्भपात यांसारख्या गंभीर आरोपांवरून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पोलिसांकडून सखोल तपास करण्यात येत आहे. या घटनेमुळे पुन्हा एकदा महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, अशा प्रकारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

### कार खरेदीच्या बहाण्याने साडेतीन लाखांची फसवणूक

**पिंपरी, ता. ०६ :** मोटार खरेदी करण्याच्या बहाण्याने बंडलमध्ये केवळ तीन खऱ्या नोटा आणि बाकी खेळण्यातील नोटा ठेवून एका तरुणाची तीन लाख ५० हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. ही घटना रविवारी (५ एप्रिल) चाकण ते शिक्रापूर रोडच्या कडेला घडली.


या प्रकरणात हुजेब फिरोज बागवान (२६, यादगारसिटी, इंदापूर रोड, बारामती) यांनी उत्तर चाकण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार गणेश ज्ञानदेव ढाकरे (२१) आणि समीर दिनकर म्हल्ले (२६, शेलगाव, खेड; मूळ- अकोला) या दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी फिर्यादीची मोटार तीन लाख ५० हजार रुपयांना खरेदी करण्याचे ठरवले. विश्वास संपादन करण्यासाठी त्यांनी तीन लाख रुपये लगेच देतो आणि उरलेले ५० हजार मोटार नावावर झाल्यावर देतो असे सांगितले. मोटारीची पूजा करायची आहे असे म्हणून ते घाईत मोटार घेऊन निघून गेले. फिर्यादीने पैशांचे बंडल तपासले असता, त्यात वरच्या आणि खालच्या मिळून केवळ तीन नोटा खऱ्या होत्या आणि मधल्या सर्व नोटा खेळण्यातील होत्या. उत्तर चाकण पोलीस तपास करत आहेत.

दरम्यान, हॉटेलमधील बिअरचे १०० रुपये उद्या देतो असे म्हटल्याच्या कारणावरून हॉटेल मालक आणि तीन वेटर यांनी मिळून एका रिक्षाचालक ग्राहकाला लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली. ही घटना गहुंजे येथे घडली. याप्रकरणी ४५ वर्षीय व्यक्तीने तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीने बिअरचे पैसे उद्या देतो असे सांगितल्याचा राग आरोपींना आला.

# भोंदू अशोक खरातवर योग्य ती कठोर कारवाई झाली पाहीजे : गौतमी पाटील

**नाशिक, ता. ६ :** नाशिकमध्ये उघडकीस आलेल्या तथाकथित भोंदूबाबा प्रकरणाने राज्यभरात खळबळ उडवली असून, या प्रकरणाचे पडसाद आता विविध स्तरांवर उमटताना दिसत आहेत. अशोक खरात याच्यावर महिला शोषणासोबतच मोठ्या आर्थिक गैरव्यवहारांचे आरोप होत असताना, प्रसिद्ध नृत्यांगना गौतमी पाटील हिनेही कठोर कारवाईची मागणी केली आहे. अशा घटनांना आळा घालण्यासाठी कठोर शिक्षा आवश्यक आहे, असे ती म्हणाली.

या प्रकरणाचा तपास पुढे जात असताना अनेक धक्कादायक बाबी समोर येत आहेत. २०२१ मध्ये समता पतसंस्थेच्या राहाता शाखेत तब्बल १०० खाती उघडण्यात आली होती. या खात्यांमधून सुमारे ६० कोटी रुपयांची



उलाढाल झाल्याची माहिती तपासात समोर आली आहे. विशेष म्हणजे या अनेक खात्यांमध्ये नॉमिनी म्हणून अशोक खरात याचे नाव जोडलेले असल्याचेही स्पष्ट झाले आहे.

तपास अधिक खोलवर गेल्यानंतर हवाला व्यवहारांचा धागाही समोर आला आहे. मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये दररोज सुमारे २५ हजार रुपये भाड्याने एक आलिशान खोली वर्षातील ३६५ दिवस बुक ठेवून, त्याठिकाणी आर्थिक व्यवहारांचे नियोजन केले जात असल्याची माहिती समोर आली आहे. याच ठिकाणाहून कोट्यवधी रुपयांची देवाणघेवाण होत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

या प्रकरणाचा विस्तार पाहता, केवळ स्थानिक गुन्हा न राहता हे एक मोठे आर्थिक आणि संघटित जाळे असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. अनेकांना अंधश्रद्धेच्या नावाखाली जाळ्यात ओढून आर्थिक फायदा मळवल्याचा आरोप आहे.

दरम्यान, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या प्रकरणात कठोर कारवाईचा इशारा दिला असून, अंमलबजावणी संचालनालयाकडून तपास होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# आई-वडिलांकडूनच तीन महिन्यांच्या चिमुरडीचा २ लाखांत सौदा?

## लैंगिक शोषणाच्या हेतूने व्यवहार तर तिघांवर गुन्हा दाखल

**फुरसुंगी, ता. ६ :** फुरसुंगी परिसरात मानवतेला काळीमा फासणारी अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे. उदरनिर्वाहासाठी आलेल्या दाम्पत्याने स्वतःच्या अवघ्या तीन महिन्यांच्या चिमुरडीला तब्बल २ लाख रुपयांना विकल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात लैंगिक शोषणाचा गंभीर संशय व्यक्त होत आहे. तर फुरसुंगी पोलीस ठाण्यात तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नितीन आप्पाराव माळी पाटील, नेहा नितीन माळी पाटील व शबाना मिराज आलम अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी जिल्हा बाल संरक्षण युनिटचे विधी व निरीक्षण अधिकारी विनोदकुमार बसप्पा कुरे (वय ४२ बिदर, कर्नाटक) यांनी फुरसुंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कर्नाटकातील बिदर जिल्ह्यातील नितीन माळीपाटील व त्यांची पत्नी नेहा हे दोघेही हडपसर-फुरसुंगी परिसरात वास्तव्यास होते. त्यांना तीन वर्षांची एक मुलगी आणि अवघ्या तीन महिन्यांची अवरिका नावाची चिमुरडी होती. आर्थिक अडचणींच्या कारणावरून या दाम्पत्याने १८ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी एका महिलेच्या स्वाधीन अवरिकाला २ लाख रुपयांना विकल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणाची माहिती जिल्हा बाल संरक्षण युनिटला मिळताच अधिकाऱ्यांनी तत्काळ चौकशी सुरू केली. प्राथमिक तपासात संबंधित महिलेने रोख रक्कम देऊन चिमुरडी ताब्यात घेतल्याचे उघड झाले असून, हा व्यवहार लैंगिक शोषणाच्या हेतूने केल्याचा गंभीर संशय अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. विशेष म्हणजे, चौकशीदरम्यान मुलीचे पालक बाल कल्याण समितीसमोर हजर राहण्याचे आश्वासन देऊनही बेपत्ता झाले असून, त्यांनी कोणतीही ठोस माहिती दिलेली नाही. त्यामुळे या प्रकरणाची गंभीरता अधिक वाढली आहे.

दरम्यान, या अमानुष प्रकाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांकडून कसून तपास सुरू आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली असून, आई-वडिलांनीच मुलीचा सौदा केला? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# ज्येष्ठ लोकनाट्य कलावंत अमन तांबे पुणेकर यांचे निधन, कला क्षेत्रात हळहळ

**पुणे, ता. ६ :** ज्येष्ठ लोकनाट्य कलावंत अमन तांबे पुणेकर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. निधनावेळी त्यांचे वय ६६ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले आणि एक विवाहित मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे लोककला क्षेत्रात हळहळ व्यक्त केली जात आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, अमन तांबे पुणेकर यांनी पुण्यातील आर्यभूषण थिएटरचे संचालक म्हणून काम पाहिले होते. त्यांनी सरस्वतीबाई कोल्हापूरकर यांच्या सहकार्याने तमाशाचा फड चालवला होता. त्यांच्या वगनाट्यांमध्ये पाच तोफांची सलामी, आईचं काळीज आणि दख्खांचा मराठा ही नाटके विशेष गाजली. संताजी घोरपडे या वगनाट्यातील औरंगजेबाची भूमिका त्यांनी प्रभावीपणे साकारली होती. त्यांनी केवळ लोकनाट्यापुरतेच नव्हे तर चित्रपट आणि दूरदर्शन मालिकांमध्येही काम केले होते. उत्कृष्ट गायक आणि सोंगाड्या म्हणून त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली होती. गेली ५० वर्षे त्यांनी लोककलेच्या माध्यमातून रसिकांचे मनोरंजन केले. अखिल भारतीय चित्रपट महामंडळ आणि शाहीर पठ्ठे बापूराव प्रतिष्ठान यांसारख्या संस्थांकडून त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते. त्यांच्या कार्यामुळे लोककला क्षेत्राला मोठे योगदान मिळाले आहे.

दरम्यान, भवानी पेठ येथील कब्रस्तान मध्ये त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे चिरंजीवराहिल तांबे यांनी अंत्यसंस्कार केले. या वेळी माजी राज्यमंत्री दिलीप कांबळे तसेच राजकीय आणि लोककला क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. अमन तांबे पुणेकर यांच्या निधनामुळे लोकनाट्य क्षेत्राने एक ज्येष्ठ आणि अनुभवी कलाकार गमावला आहे. त्यांच्या कार्याची आठवण कायम राहणार आहे.

# फेसबुकवरील टाटा सोलरची डीलरशिप पडली महागात; कुटुंबाची ५ लाख रुपयांची फसवणूक

**हडपसर, ता. ६ :** मोठ्या कंपनीची डीलरशिप मिळवून देण्याचे आमिष दाखवून सायबर गुन्हेगारांनी उरुळी देवाची (हडपसर) येथील एका कुटुंबाला ५ लाख ३ हजार २०० रुपयांना लुटल्याचा प्रकार नुकताच उघडकीस आला आहे.

याप्रकरणी श्रेयस विलास बगाटे (वय-२१, रा. धनगर वस्ती, उरुळी देवाची) यांनी उरुळी देवाची पोलीस ठाण्यात अज्ञात सायबर चोरट्यांच्या विरोधात तक्रार दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी श्रेयस बगाटे यांचे वडील विलास बगाटे यांना ऑगस्ट २०२५ मध्ये फेसबुकवर 'टाटा पॉवर सोलर'ची




एक जाहिरात दिसली होती. व्यवसाय करण्याच्या उद्देशाने त्यांनी त्यासोबत असलेल्या लिंकवर क्लिक करून आपली माहिती भरली. त्यानंतर सप्टेंबर महिन्यात त्यांना वेगवेगळ्या मोबाईल क्रमांकावरून फोन येण्यास सुरुवात झाली.

स्वतःला टाटा पॉवरचे अधिकारी सांगणाऱ्या पी. सूर्यानारायणा, पवनकुमार, आणि मुरली मोहन नावाच्या भामट्यांनी फिर्यादी आणि त्यांच्या वडिलांशी संपर्क साधला. डीलरशिपचे ग्रीमेंट, प्रॉडक्ट खरेदी, कोटेशन आणि एनओसी (NOC) मिळवून देण्याच्या नावाखाली त्यांनी बनावट कागदपत्रे आणि ईमेल पाठवले. या आमिषाला बळी पडून बगाटे कुटुंबाने २ सप्टेंबर ते २३ सप्टेंबर २०२५ या कालावधीत सायबर चोरट्यांनी दिलेल्या बँक खात्यांवर वेळोवेळी पैसे पाठवले.

विलास बगाटे व श्रेयस यांच्या खात्यावरून ३ लाख ७० हजार रुपये, व आई नीता बगाटेयांच्या खात्यावरून १ लाख ३३ हजार २०० रुपये अशी एकूण ५ लाख ३ हजार २०० रुपयांची फसवणूक केली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पैसे भरल्यानंतर २८ सप्टेंबरला मालाची डिलिव्हरी मिळेल असे सांगण्यात आले होते. मात्र, विहित मुदतीत माल न आल्याने संशय बळावला. श्रेयस यांनी आपल्या बहिणीला प्रत्यक्ष माहिती घेण्यासाठी मुंबईतील कँपनीच्या पत्त्यावर पाठवले. तिथे चौकशी केली असता, कँपनीकडून अशी कोणतीही डीलरशिप दिली जात नसल्याचे आणि संबंधित ईमेल आयडी व संपर्क क्रमांक बनावट असल्याचे स्पष्ट झाले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच कुटुंबाने सायबर पोलिसांकडे धाव घेतली.

दरम्यान, याप्रकरणी श्रेयस बगाटे यांनी सायबर पोलीस स्टेशन येथे तक्रार अर्ज आणि ऑनलाईन पोर्टलवर तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी या प्रकरणातील संशयास्पद मोबाईल क्रमांक, ईमेल आयडी, आणि संबंधित बँक खातेधारकांविरुद्ध कायदेशीर तपास सुरू केला आहे.

# जागेच्या वादातून वृद्धाच्या डोक्यात लोखंडी रॉडने हल्ला

## दौंड पोलीस ठाण्यात बाप-लेकावर गुन्हा

**दौंड, ता. ६ :** जुन्या जागेच्या व्यवहाराच्या वादातून संतापजनक आणि जीवघेणा हल्ला झाल्याची घटना उघडकीस आली आहे. किरकोळ वादाचे रूपांतर थेट प्राणघातक हल्ल्यात झाले असून, एका वृद्धाच्या डोक्यात लोखंडी रॉडने जोरदार वार केला आहे. ही घटना खानोटा (ता. दौंड) येथे २८ मार्च मध्यरात्री घडली असून या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. दोघांवर दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विलास तुकाराम जाधव आणि त्याचा मुलगा कुणाल विलास जाधव (दोघे रा. खानोटा) अशी गुन्हा दाखल करण्यात बाप-लेकांची नावे आहेत. याप्रकरणी प्रशांत सदाशिव कोष्टी (वय ३६, व्यवसाय हॉटेल) यांनी दौंड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या




माहितीनुसार, फिर्यादी प्रशांत कोष्टी व आरोपी विलास जाधव, कुणाल जाधव यांचा जुन्या जागेवरून ७ ते ८ महीण्यापुर्वी वाद झाला होता. याचाच राग मनात धरून आरोपींनी खानोटा गावातील जुनी ग्रामपंचायत कट्टा आणि फिर्यादीच्या घरासमोर शिवीगाळ करत प्रशांत कोष्टी यांना मारहाण केली. त्यानंतर परिस्थिती अधिक गंभीर बनवत आरोपींनी त्यांच्या वडिलांवर जाड लोखंडी रॉडने डोक्यावर जोरदार प्रहार केला. हा हल्ला २८ मार्च रोजी रात्री साडे दहा आणि २९ मार्च रोजी मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास केला आहे. या हल्ल्यात फियादी प्रशांत कोष्टी यांचे वडील सदाशिव कोष्टी हे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो, हे माहिती असूनही आरोपींनी बेदरकारपणे वार केला आहे. त्यामुळे हा प्रकार केवळ मारहाण नसून जाणीवपूर्वक जीवघेणा हल्ला असल्याचे स्पष्ट होत आहे. या प्रकरणी प्रशांत कोष्टी यांनी आरोपींच्या विरोधात दौंड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार आरोपींच्या विरोधात पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ११०, ११८ (१), ११५ (२), ३५१ (२), ३५२, ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक फौजदार संतोष शिंदे करत आहेत.

# लोणी काळभोरच्या विद्यार्थ्यांनी ऑलिम्पियाड गाजवला

## पृथ्वीराज कपूर हायस्कूलचे सर्वच विद्यार्थी मेरिटमध्ये चमकले

**लोणी काळभोर, ता. ६ :** लोणी काळभोर (ता. हवेली) येथील पृथ्वीराज कपूर मेमोरियल हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड (ITO) परीक्षेत अभूतपूर्व यश संपादन करत शैक्षणिक क्षेत्रात नवा इतिहास रचला आहे. राज्यस्तरीय परीक्षेतून निवड झालेल्या सर्व ३५ विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर मेरिटमध्ये स्थान मिळवत १०० टक्के यशाचा विक्रम प्रस्थापित केला आहे. या शानदार कामगिरीमुळे शाळेचा नावलौकिक राज्यभर गाजत आहे.

या परीक्षेच्या पहिल्या टप्प्यात शाळेतील एकूण ४५ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यापैकी ३५ विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्तरासाठी निवड झाली आणि




विशेष म्हणजे या सर्वच विद्यार्थ्यांनी मेरिटमध्ये झळकून दुहेरी यशाची नोंद केली. स्पर्धेच्या नियमानुसार पहिल्या १० विद्यार्थ्यांना बक्षीस, तर ११ ते २० विद्यार्थ्यांना विशेष पुरस्कार दिला जातो. या दोन्ही गटांमध्ये स्थान मिळवत शाळेने उत्कृष्टतेचा ठसा उमटवला आहे. इयत्ता दहावीतील विद्यार्थी प्रतीक प्रशांत वर्तले याने राज्यात ६ वा क्रमांक पटकावत ७०० रुपयांचे बक्षीस मिळवले, तर प्रतीक मेघरज यादव याला उत्कृष्टता पुरस्कार (Excellence ward) मिळाला आहे. उर्वरित ३३ विद्यार्थ्यांनाही मेडल व प्रमाणपत्र जून महिन्यात प्रदान करण्यात येणार असून, या यशाचा गौरव सोहळा उत्साहात पार पडणार आहे. या अभूतपूर्व यशामागे स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सहसचिव सीताराम गवळी , उपप्राचार्य शिंदे , परीक्षेचे प्रमुख जाधवर , सहाय्यक कदम मॅडम तसेच गणित व विज्ञान विषयाच्या शिक्षकांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले आहे. विद्यार्थ्यांच्या जिद्द, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचा पाठिंबा यांचा संगम या यशामागे दिसून येतो. दरम्यान, या उल्लेखनीय कामगिरीबद्दल विद्यार्थ्यांवर, पालकांवर आणि शिक्षकांवर सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत असून, लोणी काळभोरच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एक सुवर्णपान जोडले गेले आहे. ही कामगिरी इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असून, मेहनत आणि मार्गदर्शन असेल तर यश नक्की मिळते याची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.


# सविंदणे येथे पिस्टलमधून हवेत गोळीबार; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**योगेश मारणे**

शिरूर, ता. ६ : शिरूर तालुक्यातील सविंदणे गावच्या हद्दीत मध्यरात्रीच्या सुमारास पिस्टलमधून हवेत गोळीबार केल्याची धक्कादायक घटना समोर आली असून,या प्रकरणी तिघांविरुद्ध शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत शिरूर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी (ता. १) रात्री साडे अकरा वाजण्याच्या दरम्यान संविदणे गावातील लंघेवस्ती येथे राजेश सावळेराम लंघे यांच्या घरासमोर ही घटना घडली.या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक गोविंद ज्ञानदेव खटिंग (वय ४०) यांनी फिर्याद दिली.

पोलीसांनी दिलेल्या



माहितीनुसार,विजय ज्योतिबा कसेकर (सेवानिवृत्त इंडियन आर्मी) यांनी त्यांच्या परवानाधारक पिस्टलमधून शस्त्र परवाना नसलेल्या राजेश लंघे (वय-४४) व स्वाती राजेश लंघे (वय-४०) यांना विनाकारण हौसेखातर हवेत गोळीबार करण्यासाठी पिस्टल दिली.त्यानंतर दोघा दांपत्याने हवेत गोळीबारही केला. या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांच्या जीवितास व सुरक्षिततेस धोका निर्माण झाला.

विशेष म्हणजे,शास्त्राने हवेत गोळीबार करणाऱ्या व्यक्तीकडे कोणताही शस्त्र वैध परवाना नसताना शस्त्रधारी व्यक्तीने त्यांना पिस्टल देणे तसेच सार्वजनिक ठिकाणी विनाकारण गोळीबार करणे हा गंभीर गुन्हा मानला जातो. याप्रकरणी शस्त्र अधिनियम कलमांतर्गत तसेच इतर संबंधित कलमान्वये गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान या प्रकरणाचा व्हिडिओ सर्वत्र व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी गुप्त पद्धतीने या प्रकरणाचा संपूर्ण तपास केला आणि संबंधितांवर गुन्हा दाखल केला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गोविंद खटिंग करीत आहेत.अशा प्रकारांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो,त्यामुळे पोलिसांनी संबंधितांवर कडक कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

# गुळपोळीत श्री काळभैरवनाथ यात्रेत पारंपरिक सोंगांनी वेधले नागरिकांचे लक्ष

**बार्शी, ता. ६ :** गुळपोळी (ता. बार्शी) येथील गावचे ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ यात्रोत्सवानिमित विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हनुमान जयंती निमित्त सुरू झालेल्या यात्रेसाठी तालुक्यासह परिसरातील नागरिकांसह भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. आकर्षक विद्युत रोषणाई... सोबतीला मनोरंजनाच्या विविध कार्यक्रमांची रेलचेल अशा उत्साही व भक्तीमय वातावरणात यात्रा संपन्न झाली. यात्रेचे मुख्य आकर्षण असलेल्या पारंपरिक सोंगाच्या गाड्यांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

बार्शी तालुक्यासह आसपासच्या ग्रामीण भागात जत्रेच्या निमित्ताने 'पारंपारिक सोंगे' काढण्याची परंपरा आजही तितकीच जिवंत आहे. अंगाला



रंग लावून, देवांची किंवा पौराणिक पात्रांची रूपे धारण करून ही पात्रे जेव्हा गावातून फिरतात, तेव्हा ती पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी उसळते. यावेळी या पात्रांना पाहण्यासाठी नातेवाईक, ग्रामस्थ व आसपासच्या गावातील नागरिक, भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. विनोदी वृध्द दाम्पत्यांच्या पात्रांनी भाविकांना खळखळून हसविले. नेत्रदीपक शोभेच्या दारूकामाने डोळ्यांचे पारणे फेडले.

गावातील तरुण मुले, आबाल वृद्ध, व गावातील काही कलाकार राम-लक्ष्मण, हनुमान, गणपती, अस्वल, रावण, लव-कुश, भीम-अर्जुनाचे पात्र घेतात. ही पात्रे जेव्हा एकमेकांना धारेवर धरतात, तेव्हा जुन्या पिढीतील आठवणी ताज्या होतात. प्रामुख्याने हनुमान, रावण व सीताचे सोंग विशेष आकर्षणाचे केंद्र ठरते. आजच्या डिजिटल युगात जिथे मनोरंजनाची अनेक साधने उपलब्ध आहेत, तिथे या पारंपारिक सोंगे आपली वेगळी ओळख टिकवून ठेवली आहे. ही केवळ करमणूक नसून, स्थानिक संस्कृती आणि लोककलेचा एक अविभाज्य भाग आहे. पावसामुळे सर्वांची धावपळ कार्यक्रम सर्व जोमात सुरु असतानाच मध्यरात्री दीड ते पाऊणे दोन वाजण्याच्या सुमारास अवकाळी पाऊस सुरु झाला. यामुळे रंगात आलेला सोंगाचा कार्यक्रम ऐनवेळी बंद पडला. यामुळे सोंगे पाहण्यासाठी आलेल्या नागरिकांचा हिरमोड झाला. या पावसामुळे सर्वांचीच त्रेधातिरपिट उडाली. यात्रेच्या यशस्वीतेसाठी यात्रा कमिटी, ग्रामपंचायत व विविध संघटनांनी मोठे परिश्रम घेतले.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## सकाळी रिकाम्या पोटी ताक पिण्याचे जबरदस्त फायदे; पचन, वजन आणि इम्युनिटीसाठी रामबाण उपाय

उन्हाळ्याच्या दिवसांत शरीराला थंडावा देणारे आणि आरोग्याला लाभदायक असे पेय म्हणजे ताक. तज्ज्ञांच्या मते, दररोज सकाळी रिकाम्या पोटी एक ग्लास ताक पिल्यास शरीराला अनेक आरोग्यदायी फायदे मिळू शकतात. हे साधे दिसणारे पेय पचन सुधारण्यापासून ते वजन नियंत्रणापर्यंत महत्त्वाची भूमिका बजावते.

ताकामध्ये नैसर्गिक प्रोबायोटिक्स असतात, जे पचनसंस्था मजबूत ठेवण्यास मदत करतात. त्यामुळे गॅस, ॲसिडिटी, अपचन आणि पोटफुगी यांसारख्या समस्या कमी होतात. विशेषतः जिरे आणि काळे मीठ घालून घेतल्यास त्याचा परिणाम अधिक चांगला दिसून येतो.

ताक शरीराला हायड्रेट ठेवण्यास मदत करते. उष्णतेमुळे होणारी पाण्याची कमतरता भरून काढण्यासाठी ताक अत्यंत उपयुक्त ठरते. यामुळे शरीराला थंडावा मिळतो आणि थकवा कमी होतो.

वजन कमी करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांसाठी ताक हा उत्तम पर्याय आहे. कमी कॅलरी आणि कमी फॅट असल्यामुळे ते पोट भरल्यासारखे वाटते आणि जास्त खाणे टाळण्यास मदत करते. त्यामुळे वजन नियंत्रणात राहते.

तसेच ताकामध्ये कॅल्शियम, व्हिटॅमिन्स आणि खनिजे मोठ्या प्रमाणात असतात. यामुळे हाडे मजबूत राहतात आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढते. ताकातील पोटॅशियम आणि मॅग्नेशियममुळे रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासही मदत होते.

सकाळी रिकाम्या पोटी किंवा जेवणानंतर ताक पिणे फायदेशीर ठरते. त्यात जिरे, कोथिंबीर किंवा काळे मीठ घालून घेतल्यास चव आणि फायदे दोन्ही वाढतात.

ताक आरोग्यासाठी फायदेशीर असले तरी जास्त प्रमाणात सेवन टाळावे. काही विशिष्ट आजार असल्यास डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

# निवडणुका बिनविरोध व्हाव्यात हा अट्टाहास चुकीचा; खासदार संजय राऊत

**मुंबई, ता. ५ :** राहुरी आणि बारामतीमध्ये होणाऱ्या पोटनिवडणुकी संदर्भात महाविकास आघाडीमध्ये चर्चा सुरू आहे. महाविकास आघाडी एकसंघ असून चर्चेनंतर निर्णय घेतला जाईल, असे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते, खासदार संजय राऊत रविवारी सकाळी माध्यमांशी बोलताना म्हणाले. निवडणुका बिनविरोध झाल्या पाहिजे हा अट्टाहास चुकीचा असून ज्याला सरकारला मतदान करायचे नाही त्यांनी काय करायचे? हा त्यांच्यावर अन्याय असल्याचेही संजय राऊत यावेळी म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, काल शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांची दूरध्वनीवरून चर्चा झाली. राहुरी संदर्भात आज शरद पवार यांच्या पक्षाची बैठक असून काँग्रेस नेत्यांशीही आमचा संवाद सुरू आहे. यात शिवसेनेची भूमिका थोडी कमी आहे. कारण बारामतीची जागा आम्ही लढलो नव्हतो. ती जागा शरद पवारांच्या पक्षाची असून राहुरीची जागाही राष्ट्रवादीचीच आहे.

राहुरीमध्ये आमच्या पक्षाकडून तीन इच्छुक उमेदवार आहेत. राजकारणामध्ये निवडणूक लढण्यासाठी कार्यकर्ते पुढे येत असतात. आमच्याकडे इच्छुक असले तरी महाविकास आघाडी म्हणून निर्णय घ्यायचा आहे. प्राजक्त तनपुरे तिकडले माजी आमदार असून त्यांनी मागची निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेसकडून लढवली आहे. ते यावेळी निवडणूक लढणार आहेत की नाही यासंदर्भात आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये निर्णय होण्याची शक्यता आहे. पहिली संधी राष्ट्रवादीची आहे, कारण ती त्यांच्या वाट्याला आलेली जागा आहे. त्यानंतर काँग्रेस पक्षाचे त्या मतदारसंघात प्राबल्य आहे आणि आमच्याकडे तीन उमेदवार आहेत. त्यामुळे ही निवडणूक होईल, असेही राऊत म्हणाले. बारामतीतील पोटनिवडणुकीबाबत विचारले असता संजय राऊत म्हणाले की, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा केली. पण त्या भाजपबरोबर निवडणूक लढवत असून त्यांची युती आहे. याच्यावरही आमच्या पक्षामध्ये चर्चा झाली. सुनेत्रा पवार या काही महाविकास आघाडीच्या उमेदवार नाहीत. अशावेळी त्यांनी उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा केलेली असली तरी



अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. शिवसेना पक्षप्रमुख याबाबत निर्णय घेतील असे म्हणत राऊत यांनी सुनेत्रा पवार यांना पाठिंबा दिल्याची चर्चाही फेटाळून लावली.

ते पुढे म्हणाले की, भाजपसंदर्भात महाविकास आघाडीची एक भूमिका आहे. अजित पवारांसारखे नेतृत्व ज्या पद्धतीने काळाने हिरावून नेले. त्याच्यामुळे एक सहानुभूती, आदर, सन्मान आहे. पण निवडणुका लढायच्या नाहीत, बिनविरोध झाल्या पाहिजे हा अट्टाहास चुकीचा आहे. यशवंतराव चव्हाण यांनाही निवडणुकांना सामोरे जावे लागले होते. तुम्ही इतर सगळ्या निवडणुका लढता ना? त्याच्यासाठी मतं फोडतात, आमदार-खासदार फोडतात.

निवडणूक काळामध्ये मतदारांचा एक मोठा वर्ग असतो ज्याला सरकारला मतदान करायचे नसते, त्याने काय करायचे? म्हणजे जे सरकार विरोधी आहेत, कष्टकरी, शेतकरी आहेत. त्यांच्यावर बिनविरोध निवडणुका हा अन्याय आहे. त्यांना त्यांचे मत व्यक्त करण्यापासून रोखणे आहे. तरीही या दोन्ही निवडणुकांसंदर्भात महाविकास आघाडीत चर्चा सुरू आहे, असे राऊत यांनी स्पष्ट केले.

काँग्रेस निवडणुका लढण्यावर ठाम असल्याचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी स्पष्ट केले आहे. याबाबत विचारले असता संजय राऊत म्हणाले की, आम्हीही तीन उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या आहेत. राजकारणत कधी कुणावर निवडणूक लढण्याची वेळ येईल हे सांगता येत नाही. हे युद्धासारखे असून सदैव तयार राहिले पाहिजे. कुणावर जबाबदारी पडेल सांगता येत नाही. आम्ही स्वतः आमच्या उमेदवारांशी चर्चा केली आहे. हर्षवर्धन सपकाळ जर त्यांचे उमेदवार ठरवून ठेवत असतील ही चांगली गोष्ट आहे आणि राष्ट्रवादी काँग्रेस त्यांच्या उमेदवारांसंदर्भात चर्चा करत आहे. तीनही पक्ष मिळून आम्ही निर्णय घेऊ, असेही राऊत म्हणाले.

# काँग्रेसचा बारामतीमध्ये उमेदवार जाहीर, राहुरीत शरद पवारांची राष्ट्रवादी लढणार

**बारामती, ता. ६ :** बारामतीच्या पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसने अखेर आज उमेदवार जाहीर केला. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या विरोधात काँग्रेसने धनगर समाजाचा चेहरा असलेले ॲड. आकाश मोरे यांना रिंगणात उतरवले आहे. राहुरीची जागा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष लढणार असून उमेदवाराचे नाव अजून गुलदस्त्यात आहे. पोटनिवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभेसाठी २३ एप्रिल रोजी पोटनिवडणूक होणार आहे. त्या निवडणुकीत सुनेत्रा पवार बिनविरोध निवडून याव्यात यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यासंदर्भात सुनेत्रा पवार यांनी आज काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनाही फोन केला होता असे सांगण्यात येते. मात्र त्यानंतरही काँग्रेसने आज आपला उमेदवार जाहीर केला. सुनेत्रा पवार यांच्यासमोर बारामतीमध्ये १९ उमेदवार आहेत. त्यात काँग्रेसच्या आकाश मोरे यांच्यासह हिंदुस्थान जनता पार्टीचे सतीश कदम, न्यू राष्ट्रीय समाज पार्टीचे राघू घटुकडे, राष्ट्रीय किसान बहुजन पार्टीचे अरुण निटुरे यांच्यासह १५ अपक्षांचा समावेश आहे.

### तरच माघार : आकाश मोरे

आकाश मोरे यांनी या उमेदवारीबद्दल बोलताना सांगितले की, आमचा मूळ शत्रू हा भाजपा आणि त्यांची विचारसरणी आहे. भाजपसोबत जे असतील त्यांच्याविरोधात आम्ही लढणारच. अजित पवार विमान दुर्घटनेबद्दल सरकार महाराष्ट्रात एफआयआर दाखल करत असेल तर मी माघार घ्यायला तयार आहे.

# अजितदादांचं फक्त नाव पुरेसं, घातकी तटकरे–पटेलची गरज नाही

## बारामतीत लागलेल्या बॅनरची राज्यभर चर्चा

**बारामती, ता. ६ :** अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूनंतर बारामती विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक होत आहे. २३ एप्रिल रोजी येथे मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री आणि अजितदादांच्या पत्नी सुनेत्रा पवार सोमवारी अर्ज भरणार आहेत. तत्पूर्वी बारामतीमध्ये समस्ता दादाप्रेमींनी लावलेल्या बॅनरची सर्वत्र चर्चा आहे.

अजितदादांचं फक्त नाव पुरेसं, घातकी तटकरे-पटेलची गरज नाही, असे लिहिलेले बॅनर बारामतीच्या प्रशासकीय भवनाबाहेर लावण्यात आले आहेत. त्यामुळे अजित पवार गटात सर्व काही आलबेल नसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

मुंबईहून बारामतीला जाताना अजित पवार यांच्या चार्टर्ड विमानाचा




२८ जानेवारी २०२६ रोजी अपघात झाला होता. बारामती विमानतळावर झालेल्या अपघातात अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला होता. त्यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघात आता पोटनिवडणूक होत असून २३ एप्रिल रोजी मतदान होईल, तर ४ मे रोजी निवडणुकीला निकाल जाहीर केला जाणार आहे.

# गँगवॉरने नांदेड हादरले, भर रस्त्यावर तरुण नेत्याची हत्या

**नांदेड, ता. ६ :** नांदेड शहरातील श्रीनगर परिसरात सोमवारी (ता. ०६) पहाटे घडलेल्या एका निर्घृण हत्येने नांदेड पुन्हा एकदा हादरले आहे. शिवसेना युवा सेनेचे शहराध्यक्ष असलेले सोनू कल्याणकर यांची भर रस्त्यात शस्त्रांनी सपासप वार करत हत्या करण्यात आली. गेल्या तीन दिवसांत शहरात सलग पाच खून झाल्याने गँगवॉरचे सावट अधिक गडद झाले असून, पोलिस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी पहाटे सुमारे साडे पाच वाजताच्या सुमारास सोनू कल्याणकर हे नेहमीप्रमाणे आपल्या पाळीव कुत्र्यासह फेरफटका मारत होते. यावेळी श्रीनगरमधील पंचशील कापड दुकानाजवळ, कुमार ड्रेसेससमोर एक चारचाकी वाहन अचानक थांबले. त्यातून उतरलेल्या सहा ते सात हल्लेखोरांनी लोखंडी रॉड, चाकू आणि तलवारींच्या सहाय्याने त्यांच्यावर जीवघेणा हल्ला चढवला.

हल्लेखोरांनी कल्याणकर यांच्या मानेवर, पाठीवर आणि शरीराच्या विविध भागांवर वेगाने वार करत त्यांना रक्तबंबाळ केले. हल्ल्याची तीव्रता इतकी होती की, ते जागीच कोसळले आणि त्यांचा मृत्यू झाला. घटना घडताच आरोपी वाहनातून पसार झाले. या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. तपासासाठी विशेष पथके तयार करण्यात आली असून, एका संशयिताला ताब्यात घेतल्याची माहिती समोर येत आहे.

या प्रकरणाचा सर्व बाजूंनी तपास सुरू आहे. दरम्यान, त्यांच्यावर यापूर्वीही गोळीबार झाल्याची घटना घडली होती. त्या वेळी ते बचावले होते; मात्र यावेळी हल्लेखोरांनी थेट जीव घेतला.

### गँगवॉरचे वाढते सावट

नांदेडमध्ये अलीकडच्या काळात गुन्हेगारी टोळ्यांची पुन्हा एकदा सक्रियता वाढल्याचे चित्र दिसत आहे. किरकोळ वादातून सुरू होणारे संघर्ष थेट जीवघेण्या हल्ल्यांपर्यंत पोहोचत आहेत. तीन दिवसांत पाच जणांचा मृत्यू झाल्याच्या घटनांनी परिस्थितीचे गांभीर्य अधोरेखित केले आहे. गुन्हेगारांना पोलिसांचा धाक उरला नसल्याची भावना नागरिकांत निर्माण झाली असून, संघटित गुन्हेगारीवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

# देशाच्या सुरक्षिततेशी कधीच तडजोड नाही; पंतप्रधान मोदींची काँग्रेसवर टीका

**आसाम, ता. ६ :** आमचे सरकार पाकिस्तानमधील दहशतवादी तळांवर ऑपरेशन सिंदूरसारखी धाडसी कारवाई करत असताना, काँग्रेस मात्र शेजारील देशाच्या सुरात सूर मिसळून त्यांच्या तालावर नाचत आहे, अशा तीव्र शब्दांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी आसाममधील निवडणूक सभेत काँग्रेसवर हल्लाबोल केला.



आसामच्या बारपेटा जिल्ह्यातील सभेत बोलताना मोदी म्हणाले की, काँग्रेसचा पाकिस्तानशी असलेला हा संबंध देशाच्या सुरक्षेशी तडजोड करणारा आहे.

भाजप राष्ट्रहितासाठी कटिबद्ध असून आम्ही देशाच्या सुरक्षिततेशी कधीही तडजोड होऊ देणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले. तसेच, काँग्रेसने वन रँक, वन पेन्शन सारख्या योजना प्रलंबित ठेवून लष्कराची वर्षानुवर्षे उपेक्षा केली, मात्र भाजपने सैनिकांना न्याय मिळवून दिला, असेही त्यांनी नमूद केले. पंतप्रधानांनी काँग्रेसच्या विकासाच्या दृष्टीकोनावरही टीका केली. काँग्रेसने भ्रष्टाचारासाठी नेहमीच तात्पुरत्या उपाययोजना केल्या, तर भाजप समाजातील सर्व घटकांच्या सर्वांगीण आणि दीर्घकालीन विकासासाठी कार्यरत आहे.

आसाममध्ये गेल्या १० वर्षांत शांतता करारांच्या प्रामाणिक अंमलबजावणी मुळेच आज विकासाची प्रक्रिया सुरू झाली आहे. हे स्थैर्य टिकवून ठेवण्यासाठी काँग्रेसला सत्तेपासून दूर ठेवणे आवश्यक आहे, असे आवाहन त्यांनी मतदारांना केले. महिला मतदारांना संबोधित करताना मोदींनी सांगितले की, संसदेतील ३३ टक्के महिला आरक्षण २०२९ च्या निवडणुकीपासून लागू होईल. आसाममधील महिलांनी या ऐतिहासिक बदलासाठी पुढाकार घ्यावा, असे त्यांनी सुचवले. आसाम विधानसभेच्या १२६ जागांसाठी ९ एप्रिल रोजी मतदान होणार असून, त्याचा निकाल ४ मे रोजी जाहीर होईल.

# केंद्राचे धोरण शून्य, केवळ घोषणाबाजी एलपीजी दरावरून राहुल गांधींचा मोदींवर प्रहार

**नवी दिल्ली, ता. ०६ :** हे सरकार केवळ मोठ्या घोषणांवर चालते, परंतु प्रत्यक्षात त्यामागे कोणतेही ठोस धोरण नसते, ज्यामुळे संपूर्ण आर्थिक बोजा पुन्हा एकदा गरिबांवर पडला आहे, असे राहुल गांधी यांनी म्हटले.

आपल्या अधिकृत सोशल मिडिया अकाउंटवर पोस्ट करत राहुल गांधी म्हणाले की, पंतप्रधानांनी एलपीजी संकटाचा सामना करण्यासाठी कोविड काळाप्रमाणे सज्ज राहण्याचे आवाहन केले होते, आणि दुर्दैवाने त्यांनी तसेच केले. कोविड काळात ज्याप्रमाणे धोरणशून्य नियोजनामुळे सामान्य जनतेचे हाल झाले, तसेच आता गॅस संकटाबाबत घडत आहे. दररोज ५०० ते ८०० रुपये कमवणाऱ्या मजुराच्या आवाक्याबाहेर आता घरगुती गॅस गेला असून, रात्री घरी



परतल्यावर चूल पेटवण्यासाठीही त्यांच्याकडे पैसे उरलेले नाहीत, अशी भीषण परिस्थिती त्यांनी मांडली.

खासदार राहुल गांधी यांनी असाही दावा केला की, सरकारच्या राजनैतिक चुकांमुळे हे संकट ओढवले आहे. कापड उद्योग आधीच आयसीयूमध्ये आहे आणि उत्पादन क्षेत्र श्वास घेण्यासाठी धडपडत आहे. जेव्हा अहंकार हेच धोरण बनते, तेव्हा अर्थव्यवस्था कोलमडते आणि देश अनेक दशके मागे जातो, अशी टीका त्यांनी केली. दरम्यान, मजुरांना पुन्हा एकदा शहरातून गावाकडे स्थलांतर करावे लागत असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. प्रत्येक संकटात नेहमी गरिबाचाच बळी का जातो? असा सवाल उपस्थित करत राहुल गांधी यांनी जनतेला या अन्यायाविरुद्ध गप्प न बसण्याचे आवाहन केले आहे.

# अजितदादांना श्रद्धांजली म्हणून बारामतीची पोटनिवडणूक लढवणार नाही : शशिकांत शिंदे

**बारामती, ता. ५ :** बारामती आणि राहुरी या ठिकाणी पोटनिवडणूक पार पडणार आहे. त्याबाबत शशिकांत शिंदे यांनी शरद पवारांशी चर्चा केली. ज्यानंतर शशिकांत शिंदेंनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष बारामतीची पोटनिवडणूक लढणार नाही हे पुन्हा एकदा जाहीर केलं आहे. २८ जानेवारीला अजितदादांचा अपघाती मृत्यू झाला. बारामती या ठिकाणीच त्यांचं विमान कोसळलं आणि त्यांचा मृत्यू झाला. यानंतर बारामती या ठिकाणी पोटनिवडणूक पार पडणार आहे.

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या बाबतीत आम्ही अजितदादांना श्रद्धांजली म्हणून ही निवडणूक लढवणार नाही हे स्पष्ट करण्यात आलं आहे. राहुरीच्या बाबतीत आम्ही चर्चा केली आहे. राहुरीबाबत महाविकास आघाडी म्हणून आम्ही काँग्रेस, शिवसेना



उद्धव ठाकरे पक्षांशी चर्चा करुन निर्णय घेणार आहोत.

अजितदादांचा अपघाती मृत्यू झाला तेव्हाच आम्ही निर्णय जाहीर केला होता की बारामतीची पोटनिवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष लढवणार नाही. राहुरीच्या संदर्भात आम्ही मविआच्या नेत्यांशी चर्चा करुन निर्णय घेऊ. बाळासाहेब थोरात यांच्याशी, हर्षवर्धन सपकाळ यांच्याशी चर्चा करु, शिवसेनेशी चर्चा करु त्यानंतर निर्णय घेऊ. प्राजक्त तनपुरे यांच्याशीही आमची चर्चा झाली आहे. बारामती आणि राहुरी या दोन्ही ठिकाणची पोटनिवडणूक बिनविरोध झाली पाहिजे असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करत आहेत. आम्ही चर्चा करुन राहुरीबाबतचा काय तो निर्णय घेऊ. असंही शशिकांत शिंदे यांनी म्हटलं आहे.

### २३ एप्रिलला पोटनिवडणूक

अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर रिक्त झालेल्या बारामती येथील जागेसाठी २३ एप्रिलला पोटनिवडणूक होणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाकडून सुनेत्रा पवार निवडणूक लढवणार आहेत. ही निवडणूक बिनविरोध व्हावी असा सरकारचा प्रयत्न आहे. दरम्यान २३ एप्रिलला निवडणूक पार पडल्यानंतर ४ मे रोजी या निवडणुकीचा निकाल जाहीर केला जाणार आहे.

# भोंदू अशोक खरात प्रकरणातील व्यवहारांची ईडी चौकशी होणार : मुख्यमंत्री फडणवीस

**नाशिक, ता. ६ :** नाशिकमधील भोंदू अशोक खरात प्रकरण राज्यभर गाजलं आहे. या भोंदू अशोक खरातला बलात्काराच्या आरोपाखाली पोलिसांनी अटक केलं आहे. सध्या भोंदू खरात कोठडीत असून त्याची एसआयटीद्वारे चौकशी करण्यात येत आहे. या प्रकरणात दररोज अनेक धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. याच अशोक खरात प्रकरणाबाबत आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना मोठं वक्तव्य केलं आहे.

भोंदू अशोक खरात प्रकरणातील सर्व व्यवहारांची ईडी चौकशी होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. तसेच भोंदू अशोक खरातवर आतापर्यंत एकूण



१२ गुन्हे दाखल झाले असल्याची माहिती देखील मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली आहे.

अशोक खरात प्रकरणाचा तपास सुरू आहे. अशोक खरातच्या संपत्तीची आणि गैरव्यवहारांची चौकशी केली जाईल. अशोक खरात प्रकरणात काही लोक राजकारण करण्याचा प्रयत्न करत आहेत. पण मी स्पष्ट सांगतो की अशा प्रकरणाबाबत सरकारला जे करायला पाहिजे ते सरकार करत आहे, असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटलं आहे.

अशोक खरात प्रकरणात आतापर्यंत १२ गुन्हे दाखल झाले आहेत आणि दररोज नवीन माहिती समोर येत आहे. या प्रकरणात एसआयटी रोज काय तपास करते हे रोजच सांगता येणार नाही. पण एसआयटी योग्य वेळी या प्रकरणाबाबत सविस्तर माहिती देईल. त्यामुळे मला वाटतं की सर्वांनी एसआयटीवर विश्वास ठेवावा. एसआयटी उत्तम काम करत आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. अशोक खरात प्रकरणातील सर्व व्यवहारांची ईडी चौकशी होणार का? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला. यावर बोलताना फडणवीस म्हणाले की, खरात प्रकरणातील व्यवहारांबाबत नक्कीच ईडी चौकशी होणार आहे. त्याबाबत ईडीने या गोष्टीची माहिती घेतली आहे. ईडीनेही त्यांची कारवाई सुरू केलेली आहे. एकदा खरातच्या जमिनी कुठे-कुठे आहेत, याची माहिती समजली की नियमानुसार जे-जे करावं लागेल ते आम्ही करणार आहोत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे.

### सीडीआर कोणी लीक केला? चौकशी होणार

अशोक खरात प्रकरणातील सीडीआर कोणालाही प्राप्त करून घेण्याचा अधिकार नाही. तो अधिकार फक्त ज्या तपास यंत्रणा आहेत त्यांनाच तो अधिकार आहे. मात्र, या प्रकरणातील सीडीआर कसा लीक झाला? तो सीडीआर कोणी लीक केला? या संदर्भातील चौकशी राज्य सरकार करणार आहे. मला असं वाटतं की अशा प्रकारच्या प्रकरणात फक्त आरोप-प्रत्यारोप करून चालत नाही. ज्यांच्या विरोधात सबळ पुरावा असेल त्यांच्यावर कारवाई होईलच. मात्र, कोण-कोणाशी बोललं या आधारावर आपली क्रिमिनल जस्टिस सिस्टम चालत नाही, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.